पूणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. पीडब्ल्यूसी कंपनीस माहे एप्रिल २०१९ ते जून २०१९ या कालावधीकरीता केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीसीटी-३६१६/प्र.क्र.७६/भाग-४/पोल-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, २ रा मजला, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ सप्टेंबर, २०१९

वाचा:

१. शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, क्रमांक : GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), दि.०१.०७.२०१४, दि.१९.०७.२०१७, दि.०९.१०.२०१७, दि.२०.०३.२०१८ व दि.०९.०५.२०१९.
२. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी ३६१५/प्र.क्र.९३/पोल-३, दि.२९.०५.२०१५
३. शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक सीसीटी-३६१५/प्र.क्र.७६/भाग-१/पोल-३, दि.२५.०७.२०१६, दि.०५.०६.२०१७, दि.२५.०७.२०१७ व दि.१३.१२.२०१८
४. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे पत्र क्र. प्रलि-३/सीसीटीव्ही कॅमेरा सदयस्थिती/२०१९/ २९३, दि.१५.०६.२०१९ व क्र. प्रलि-३/सीसीटीव्ही कॅमेरा सदयस्थिती/२०१९/३९५/१६३६, दि.२९.०७.२०१९
५. मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.ली. यांचे दि.२२.०८.२०१९, दि.१०.०६.२०१९ व दि.०६.०७.२०१९ रोजीचे पत्र व दि.०५.०९.२०१९ रोजी इमेलद्वारे पाठवलेले सुधारित देयक.

प्रस्तावना :-

पुणे व पिंपरी चिंचवड शहर येथील सीसीटीव्ही प्रकल्पाकरिता तांत्रिक सल्लागार म्हणुन गृह विभाग, शासन निर्णय दि.२९.०५.२०१५ अन्वये मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.ली. या कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. उक्त कंपनीच्या एका पूर्णवेळ वरीष्ठ सल्लागारास व एका अतिरिक्त सल्लागारास दि.१३.१२.२०१८ च्या शासन निर्णयानुसार दि.३०.०६.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. उक्त सल्लागारांना माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.०५.२०१९ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे मानधन अनुज्ञेय आहे.

२. उक्त कंपनीच्या एका पूर्णवेळ वरीष्ठ सल्लागारास व एका अतिरिक्त सल्लागारास मार्च २०१९ पर्यंत केलेल्या कामाचे देयक अदा करण्यात आले आहे. त्यांनी एप्रिल २०१९ ते जून २०१९ पर्यंत केलेले काम समाधानकारक आहे व उक्त प्रकल्प हा सुरळीत चालू असल्याचा अहवाल पालीस आयुक्त, पुणे शहर यांनी संदर्भ क्र.४ येथील पत्रांद्वारे सादर केला आहे. त्यानुसार पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार मे. पीडब्ल्यूसी कंपनीने सादर केलेली देयके अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय-</u>

पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाकरिता सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.ली. या कंपनीचे एका पूर्णवेळ वरीष्ठ सल्लागारास व एका अतिरिक्त सल्लागारास एप्रिल २०१९ ते जून २०१९ पर्यंत केलेल्या कामाचे मानधन म्हणून एकुण रु.१८,७०,७२२/- (अक्षरी रुपये अठरा लाख सत्तर हजार सातशे बावीस फक्त) इतकी रक्कम मे.पीड्ब्ल्युसी कंपनीस अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर देयकांचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

Pune CCTV Project April – June 2019

#	Period	Month	Resource Name	Designation	Man Month Rate (INR)	Deployment (Percentage)	Applicable Amount per Resource (INR)	Sub Total (INR)	GST @ 18%	OPE Claimed (INR)	Total Amount (INR)
A	B	C	D	E	F	G	H = FxG	I	J= 18% OF I	K	L = I + J + K
1	April 2019 to June 2019	April 2019	Nikhil Motlag	Senior Consultant	2,77,200	100%	2,77,200	5,24,700	94,446	3,750	6,22,896
			Amit Bhosale	Consultant	2,47,500	100%	2,47,500				
2		May 2019	Nikhil Motlag	Senior Consultant	2,77,200	100%	2,77,200	5,24,700	94,446	4,800	6,23,946
			Amit Bhosale	Consultant	2,47,500	100%	2,47,500				
2		June 2019	Nikhil Motlag	Senior Consultant	2,77,200	100%	2,77,200	5,24,700	94,446	4,734	6,23,880
			Amit Bhosale	Consultant	2,47,500	100%	2,47,500				
Total							**15,74,100**	**15,74,100**	**2,83,338**	**13,284**	**18,70,722**

टीप :-

अ) उपरोक्त रकमा ह्या दरमहिना दरमाणुस (Man-Month) तत्वानुसार अदा करण्यात येत आहे.

ब) शासन निर्णय संदर्भ क्र.१ नुसार सल्लागारांना प्रकल्पावर होणा-या खर्चाच्या ५% च्या प्रमाणात प्रवास, भोजन व निवास इ. खर्च अनुज्ञेय करण्यात आला आहे.

क) संदर्भ क्र.५ अन्वये मे. पीड्ब्ल्युसी कंपनीने सादर केलेल्या देयकानुसार सदर रकमा देण्यात येत आहेत. सदर रकमांमध्ये एप्रिल, २०१९ ते जून, २०१९ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी १८% वस्तू आणि सेवा कर समाविष्ट करण्यात आला आहे.

ड) सीसीटीव्ही प्रकल्पासाठी संबंधित कंपनीला सल्लागारांच्या मानधनापोटी जादा रक्कम अदा केली आहे असे निदर्शनास आल्यास सदर जादा रक्कम संबंधित कंपनीकडून समायोजित करण्याचा अधिकार शासनास राहील.

इ) सदर देयके ही अंमलात असलेले कर वजाती करून अदा करण्यात यावी.

२. प्रस्तुत प्रकरणी येणारा खर्च "२०५५ - पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००) (०१) जिल्हा पोलीस बल, १३, कार्यालयीन खर्च (२०५५ ०१६८)" या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९२४१५००४९२८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a49495d0d4b31e36ff1d612a85453ca984b74e28fd6f99cdf66e3e499969e942, cn=Dinesh Appaji Saste
Date: 2019.09.24 15:02:19 +05'30'

(दिनेश आ. सस्ते)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. पोलीस आयुक्त, पुणे शहर.
५. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
७. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११. मे. पीडब्ल्युसी प्रा.लि., २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.
१२. कार्यासन अधिकारी (व्यय-७/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती / पोल-३.

*****